**पुणे विद्यापीठ**

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**: परिपत्रक क्र. १०७/१३ :**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, मा. कुलगुरु यांनी मान्यता दिल्यानुसार ज्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थांमध्ये उन्हाळयाच्या सुट्टीच्या कालावधीत (परीक्षेनंतर) कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका' योजना राबवायची आहे. त्यांना योजनेतील मार्गदर्शक तत्वांच्या अधिन राहून काम करण्याची अनुमती देण्यात येत आहे.

उन्हाळयाच्या सुट्टीच्या कालावधीतील या योजनेकरीता प्रस्ताव पाठवून मान्यता घेणे आवश्यक आहे. माहे फेब्रुवारी, २०१३ नंतर या योजनेवर झालेल्या खर्चाचा हिशेबपुढील शैक्षणिक वर्षात सादर करावा.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये नियमितपणे कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविणेकरीता माहे जून, २०१३ मध्ये प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठवून योजनेची नियमित मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करणाऱ्या महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त संस्थानी योजना राबविण्याबाबत मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ यांची रितसर मान्यता घेतलेली असावी.

**विद्यार्थी कल्याण मंडळ )**
**गणेशखिंड, पुणे – ०७. )**
**दिनांक : २२ एप्रिल, २०१३ )**
**जावक क्र : २०१२–१३/९१२)**

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

<u>प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी</u> :

१) मा. कुलगुरु यांचे कार्यालय.
२) मा. कुलसचिव यांचे कार्यालय.
३) मा. वित्त व लेखाधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे – ०७
४) मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
५) मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.